नि.फौ.ख.क्र.१६१ /२०२०
सरकार वि. धर्मराज
नि.क्र.२२

साक्षीदार क्र **०३** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–दिलीप हरिभाऊ कामडी
वय:–४३ वर्ष, व्यवसाय–मजुरी
राह.सिर्सी, ता.उमरेड, जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत</u>**

१. घटनेबाबत मला काही माहीती नाही. पोलिसांनी माझे बयाण घेतले नव्हते. पोलिसांनी मला घटनास्थळावर बोलवले नव्हते. आता मला समन्सपत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे त्यातील मजकुर मला माहित नाही सहीपुरता **नि.क्र.२३** देण्यात आला. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे त्यातील मजकुर मला माहित नाही सहीपुरता **नि.क्र.२४** देण्यात आला. माझ्यासमक्ष पोलिसांनी जप्ती पंचनामा तयार केला नव्हता तसेच माझ्यासमक्ष एक वेळवाची काठी लोखंडी पाते असलेली जप्त केली नव्हती. सदर पप्ती पंचनाम्यावर माझी सही आहे त्यातील मजकुर मला माहीती नाही सहीपुरता **नि.क्र.२५** देण्यात आला. पोलिसांनी मला घटनास्थळावर बोलवले नव्हते.

**<u>सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी दि.३१/०८/२०२० रोजी माझे बयाण घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष आरोपीने फिर्यादीला काठीने मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा तयार केला व मला वाचुन दाखविला तो खरा असल्याची खात्री करून मी त्यावर सह्या केल्या. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीकडुन पोलिसांनी एक लोखंडी पाते असलेली वेळवाची काठी माझ्यासमक्ष जप्त केली होती. आता मला माझ्या बयाणातील **अधोरेखांकित भाग अ** वाचुन दाखविण्यात आला तो बरोबर नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**
**<u>आरोपीतर्फे ॲड. एस.एस. रामटेके यांनी उलटतपास नाकारला.</u>**
**<u>फेरतपास काही नाही.</u>**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि ०७.०२.२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड